# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त फार्मसी विद्यार्थ्यांचा संशोधन महोत्सव



पुणे : जिल्हा शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या मालिकेअंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, हडपसर येथे राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना देणे, संशोधनवृत्ती विकसित करणे, सर्जनशीलतेला वाव देणे तसेच फार्मसी क्षेत्रातील त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन तसेच स्व. अजितदादा पवार साहेबांना विनम्र अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. चेतन तुपे, आमदार, हडपसर विधानसभा मतदारसंघ, पुणे हे होते. तसेच मा. श्री. शंतनू जगदाळे, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, हडपसर विधानसभा मतदारसंघ आणि मा. श्री. अमर तुपे, कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, हडपसर विधानसभा मतदारसंघ यांच्या शुभ उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. याचबरोबर मा. श्री. एल. एम. पवार, सहाय्यक सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील सर यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, ''डिप्लोमा इन फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यामागील उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे तसेच फार्मसी क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि महत्त्व अधोरेखित करणे हा आहे. अशा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांना आपले ज्ञान, कल्पकता आणि वैज्ञानिक विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळते. भविष्यात ते समाजाभिमुख, कुशल आणि जबाबदार फार्मासिस्ट म्हणून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.''

प्रमुख पाहुणे मा. श्री. चेतन तुपे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात फार्मसी क्षेत्रातील झपाट्याने होत असलेल्या प्रगतीवर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, ''भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नॅनोतंत्रज्ञानाच्या साहाय्याने नॅनो-मॉलिक्यूल्सच्या स्वरूपातील सूक्ष्म रोबोट्स मानवी शरीरात कार्यरत होतील आणि त्यांचे नियंत्रण कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे केले जाईल. फार्मसी क्षेत्रात संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्यसेवेमध्ये क्रांतिकारी बदल घडत आहेत.'' त्यांनी औषधनिर्मिती, वैयक्तिकृत औषधोपचार, स्मार्ट ड्रग डिलिव्हरी सिस्टीम आणि इतर आधुनिक संशोधनाची अनेक उदाहरणे देत विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार करण्याचे आवाहन केले.

यानंतर मा. श्री. एल. एम. पवार यांनी आपल्या मनोगतात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करत संस्था शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित कार्याच्या माध्यमातून समाजाला अनेक गुणवंत, कर्तृत्ववान आणि जबाबदार व्यक्तिमत्त्वे घडवत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच सामाजिक जाणीव, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव जोपासावा, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

मा. श्री. एल. एम. पवार साहेब, सहाय्यक सचिव, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेस राज्यभरातील नामांकित फार्मसी महाविद्यालयांकडून ५० हून अधिक पोस्टर्स प्राप्त झाली असून १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आधुनिक फार्मसी, औषधनिर्मिती, सार्वजनिक आरोग्य, कृत्रिम बुद्धिमत्ता, औषध वितरण प्रणाली, पर्यावरणपूरक औषधनिर्मिती आदी विषयांवर आकर्षक, माहितीपूर्ण व संशोधनाधिष्ठित पोस्टर्स प्रभावीपणे सादर केली. विद्यार्थ्यांचा उत्साह, सादरीकरणातील आत्मविश्वास आणि विषयावरील प्रभुत्व पाहता परीक्षकांसमोर गुणवंतांची निवड करणे अत्यंत आव्हानात्मक ठरले.

स्पर्धेचे परीक्षण श्री. ए. एन. मनियार, वरिष्ठ प्राध्यापक, एस. व्ही. पी. एम. कॉलेज ऑफ फार्मसी, माळेगाव, डॉ. स्वामी गौरीशंकर, प्राचार्य, भालचंद्र कॉलेज ऑफ फार्मसी तसेच श्री. प्रवीण जावळे, वरिष्ठ प्राध्यापक, भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांनी अत्यंत वस्तुनिष्ठ आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत संशोधनाची दिशा, विषयातील नावीन्य, वैज्ञानिक मांडणी आणि सादरीकरण कौशल्य याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपले संशोधनात्मक विचार प्रभावीपणे मांडण्याचे व्यासपीठ मिळाले असून फार्मसी शिक्षणातील गुणवत्ता, नवोपक्रम आणि संशोधन संस्कृतीला निश्चितच चालना मिळणार असल्याचा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

त्यानंतर स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. सौ. वेणूताई चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी, फलटण येथील विद्यार्थी श्री. तनमन बरडे* यांनी उत्कृष्ट सादरीकरण करत स्पर्धेचे *प्रथम पारितोषिक* पटकाविले. त्यांना *रु. ५००१/- रोख रक्कम, आकर्षक मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र* प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच सिद्धांत कॉलेज ऑफ फार्मसी, सुदामरे येथील *कु. तृप्ती कड* आणि *कु. संजीवनी माने* यांनी स्पर्धेत *उपविजेतेपद* मिळविले. त्यांना *रु. ३००१/- रोख रक्कम, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र* देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्ष मा. सुनेत्राताई पवार, उपाध्यक्ष मा. राजेंद्र घाडगे, मानद सचिव मा. ॲड. संदीप कदम, खजिनदार मा. ॲड. मोहनराव देशमुख तसेच श्री. एल. एम. पवार व श्री. ए. एम. जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील सर यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी समन्वयन प्रा. संपदा घुले यांनी केले, तर त्यांनीच कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत अधिक खुलविली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. अंजली देशमुख व प्रा. निशिगंधा चोपडे यांनी उपस्थित मान्यवर, परीक्षक, सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. अशा प्रकारे राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.